दिव्य मराठी विशेष

महापालिकेच्या मटाले विद्यालयात विद्यार्थ्यांच्या हस्ते उद्घाटन, २४ ऑगस्टपर्यंत महोत्सवात दाखविण्यात येणार ४० चित्रपट

# ‘नदी वाचवा’ संदेश देणाऱ्या वसुंधरा चित्रमहोत्सवास प्रारंभ

नाशिक

युवक व मुलांना पर्यावरण समस्यांप्रति संवेदनशील बनविण्याचे प्रयत्न करण्यासाठी भरविण्यात येणाऱ्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे कामटवाडे परिसरातील महापालिकेच्या मटाले विद्यालयात विद्यार्थ्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. २४ ऑगस्टपर्यंत हा महोत्सव आहे.



हा महोत्सव नाशिकमध्ये सलग आठव्या वर्षी होत असून या वर्षीच्या महोत्सवाचा विषय ‘नदी वाचवा, जीवन वाचवा’ असा आहे. महोत्सवाचे मार्गदर्शक वीरेंद्र चित्राव यांनी महोत्सवाची संकल्पना सांगताना नद्यांची आजची अवस्था कशी भीषण आहे, याची माहिती नववी-दहावीच्या विद्यार्थ्यांना दिली. दक्षिणगंगा गोदावरीसाठी काय उपाययोजना करता येतील या संदर्भात चित्राव यांनी मुलांना प्रश्न विचारले. यावेळी मुलांनी प्लास्टिकचा वापर कमी करून सांडपाणी प्रक्रियेद्वारे थेट शहराबाहेर सोडण्यासारखे उपाय सांगितले.

मटाले विद्यालयातील विद्यार्थ्यांना महोत्सवातील काही लघुपट दाखविण्यात आले. नंतर दिवसभरात रायगड चौकातील मनपा विद्यालय, आर. पी. विद्यालय या मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये गप्पीज जर्नी, टुगेदर पॉसिबल, प्लास्टिक प्लानेट, ग्रीन आर्मर, द डाइंग प्लानेट, गणपती बाप्पा मोरया हे चित्रपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. ४० फिल्म्स या महोत्सवात दाखवण्यात येणार आहेत. सून ‘वसुंधरा जगवा, तगवा आणि भावी पउदघाटनप्रसंगी किर्लोस्कर ऑइल इंजिनचे मकरंद देवधर, देवेंद्र देवरे, शोकेस व कुसुमाग्रज फिल्म सोसायटीचे हेमंत बेळे, योगेश एकबोटे, अमित टिल्लू, यतीन कुलकर्णी, मटाले विद्यालयाचे मुख्याध्यापक मझदे आदी उपस्थित होते.

## कोकरे यांना उद्या पुरस्कार प्रदान

बुधवारी सायंकाळी पाचला रामदास कोकरे यांना वसुंधरा सन्मान पुरस्कार अभिनेते मकरंद अनासपुरे व श्वास चित्रपटाचे दिग्दर्शक संदीप सावंत यांच्या हस्ते कुसुमाग्रज स्मारकात प्रदान केले जातील. यावेळी निसर्ग मित्र मंडळ, विजय सांबरे व चातक नेचर कॉन्झर्वेशन सोसायटी यांना वसुंधरा मित्र पुरस्कार प्रदान होईल.